**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.०२ यांचा उलट तपास गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्रीमती. आर.एस. सोनकांबळे, यांच्या मार्फत शपथेवर सुरू:-**

योगेश माझ्या भावाचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, स्वातीचे लग्न आदी माझ्या भावाचा मुलगा अबा यांच्याशी जुळले होते. हे म्हणणे खरे नाही की, अबा बरोबर सोयरीक ठरली होती पण लग्न झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, योगेशचे वडील माझे सखे भाउ असल्याने लग्नाचा सर्व खर्च त्यांनी उचला होता. स्वाती व योगेश लग्न रघूकूल मंगल कार्यालय येथे झाले. मंगल कार्यालय व इतर खर्च केल्याच्या पावत्या या अर्जाच्या कामी आम्ही जोडलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व गेरअर्जदार यांचे लग्न गैरअर्जदार यांच्या वडीलांनी केले. हे म्हणणे बरोबर आहे की, गैरअर्जदार यांच्या वडीलांनी लग्न प्रसंगी अर्जदार हीला सहा तोळयाचे दागीने केले होते.

आम्ही लग्न प्रसंगी मणीमंगळसुत्र व दोन तोळे, कपाट,कॉट व कूलर व इतर संसार उपयोगी साहीत्य दिले. त्यांची पावती या अर्जाच्या कामी दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्वाती २०१८ पर्यंत योगेश सोबत राहिली. स्वाती ही २०१८ नंतर पण योगेश सोबत नंदात होती. स्वाती व योगेश यांना बलदेव मुलगा तीन वर्षानी झाला. हे म्हणणे खरे नाही की, स्वाती चार महिणेच योगेश सोबत नांदली हे मी खोटे सांगत आहे. स्वाती त्यांला शोभत नाही म्हणून दुसरे लग्न करायचे अशा स्वरुपाचा अर्ज आम्ही पोलिस स्टेशनला दिला नाही.

मला माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील पॅरा क्रमांक ५ हा वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्राच्या कॉलम ५ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांने अर्जदार हिला कधीही पत्नी म्हणून स्विकारले नाही म्हणून तीला दोन मुले झाली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांचे दोन्ही भाउ नगर येथे वास्तव्यास

होते. हे म्हणणे खरे नाही की, स्वाती व तिची सासू आणि गैरअर्जदार हे तिघे एकत्र राहतात. गैरअर्जदार यांचे दोन्ही भाउ चार वर्ष अगोदर नगर येथे राहतात होते. योगेश यांनी मुलाला दांडघयाईने नेले यांची तक्रार आम्ही पोलिसात केली. गैरअर्जदार यांने स्वतःचा मुलगा अर्जदार पासून डाबून ठेवल्याने तीला मुलगा मिळालेला नाही.

हे म्हणणे बरोर आहे की, योगेश वडीलांच्या व चुलत्याच्या विरुध्द वाटपाचा दावा दाखल केला होता. आमच्यातील तडजोडी प्रमाणे मला एक एकर व स्वातीला एक एकर व मुलाच्या नावावर एक एकर जमीन नोंदविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिचा मानसीक संतलुन बिघडे होते म्हणून आम्ही ससून हॉस्पीटल पूणे येथे नेले होते. स्वातीला पूण्याला ससून हॉस्पीटलला औधोपचारासाठी नेल्यासाठी डॉक्टरानी वर्षभरासाठी औषध दिले नाही. आम्ही योगेश व त्यांच्या घराच्याबद्दल पोलिसात तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज मतीला योगेशच्या नावावर एक गुंठा पण जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, योगेशला कोणतेही उत्पन्न नाही. हे म्हणणे खरे नाही की, योगेश ची पोटगी देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुलीला मदत व्हावी म्हणून खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.02.11 12:54:12 +0530

**न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**दिनांकः– १०.०२.२०२६** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**